Toppersnotes®
Unleash the topper in you

# MPSC

## राज्यसेवा पूर्व एवं मुख्य परीक्षा

## महाराष्ट्र लोक सेवा आयोग

### सामान्य अध्ययन

पेपर I – भाग – 1

## इतिहास

SIERRA INNOVATIONS

# Maharastra - PSC

## आधुनिक भारताचा विशेषत :- महाराष्ट्राचा


| क्र.सं. | अध्याय | पृष्ठ सं. |
|---|---|---|
| 1. | महाराष्ट्राचा इतिहास (1818 - 1857) | 1-12 |
| 2. | ब्रिटीश सत्तेची भारतामध्ये स्थापना | 13-29 |
| 3. | सामाजिक - सांस्कृतिक बदल | 30-42 |
| 4. | सामाजिक व आर्थिक जागृती | 43-62 |
| 5. | गांधी युगातील राष्ट्रीय चळवळ | 63-116 |
| 6. | स्वातंत्र्योत्तर भारत | 117-188 |
| 7. | महाराष्ट्रातील निवडक समाजसुधारक | 189-235 |
| 8. | महाराष्ट्राचा सांस्कृतिक वारसा (प्राचीन ते आधुनिक) | 236-266 |


# प्रिय विद्यार्थी, टॉपर्सनोट्स चुनने के लिए धन्यवाद।

## नोट्स में दिए गए QR कोड्स को स्कैन करने लिए टॉपर्स नोट्स ऐप डाउनलोड करे।


ऐप डाउनलोड करने के लिए दिशा निर्देश देखे :-

**ऐप इनस्टॉल करने के लिए आप अपने मोबाइल फ़ोन के कैमरा से या गूगल लेंस से QR स्कैन करें।**


**टॉपर्सनोट्स एग्जाम प्रिपरेशन ऐप**




**टॉपर्सनोट्स ऐप** डाउनलोड करें गूगल प्ले स्टोर से।





लॉग इन करने के लिए अपना **मोबाइल नंबर** दर्ज करें।




अपनी **परीक्षा श्रेणी** चुनें।




**सर्च बटन पर** क्लिक करें।




**SCAN QR पर** क्लिक करें।





किताब के **QR कोड को स्कैन** करें।




- सोल्युशन वीडियो
- डाउट वीडियो
- कॉन्सेप्ट वीडियो




- अतिरिक्त पाठ्य-सामग्री




- विषयवार अभ्यास
- कमजोर टॉपिक विश्लेषण




- रैंक प्रेडिक्टर
- टेस्ट प्रैक्टिस

किसी भी तकनीकी सहायता के लिए **hello@toppersnotes.com** पर मेल करें या **766 56 41 122** पर whatsapp करें।

Toppersnotes
Unleash the topper in you

# महाराष्ट्राचा इतिहास (1818 - 1857)

आधुनिक शिक्षणाची ओळख ⇒

समाजाची सर्वांगिण प्रगती होण्यासाठी शिक्षण हेच एक प्रभावी माध्यम आहे. आपले प्राचिन भारतिय शिक्षण हे पावित्र शुद्धता यावर आधारीत होते. संस्कृत हे माध्यम असल्याने बहुजन समाज हा शिक्षणापासून दूर होता. मिशनरींच्या कार्यातूनच भारतात आधुनिक शिक्षणाची सुरुवात झाली.

* बंगाल मधील शिक्षण ⇒

1882 मध्ये कोलकत्ता येथे इंग्रजी शाळा राजा राममोहन रॉय यांच्या प्रेरणेने सुरु झाली.

*1825 ला वेदांत कॉलेजची स्थापना झाली. राजा राममोहन रॉय, राधाकांत देव, इंग्रज व्यापारी डेव्हीड हेअर यांच्या मदतीने केली.

* 1819 ला कलकत्ता स्कुल सोसायटी ची स्थापना झाली.

* 1835 ला कलकत्ता मेडीकल कॉलेजची स्थापना झाली.

* 1835 पर्यंत कलकत्यात 25 शाळा होत्या. ज्या शाळांतून 1400 मुले शिकत होती.

ब्रिटीश काळातील शिक्षण ⇒

शिक्षणाचे माध्यम कोणते असावे यावरून वाद होता. 1813 साली झालेल्या चार्टर ॲक्ट ने भारतातील शिक्षणाची जबाबदारी कंपनीवर टाकली.

1834 ला बेंटीक जेव्हा भारतात आला तेव्हा मॅकॉले हा गवर्नर जनरल कौन्सिलचा कायदामंत्री होता. बेंटीकने त्याला कमिटी ऑफ पब्लीक इन्स्ट्रकशनचा अध्यक्ष केले. ~~मॅको~~ मेकॉले चे असे मत होते की शिकलेले तरुण इंग्रजांचे समर्थक बनतील. त्यांच्यावर पाश्चात्य संस्कृतीचा प्रभाव पडल्याने त्यांच्या आवडी-निवडी बदलतील. इंग्रजी मालाला भारतात मागणी मिळेल. त्याने अशा प्रकारे पाश्चात्य शिक्षणालाच महत्व दिले होते. परंतु त्यांचा हा अहवाल सर्वमान्य नव्हता. त्याला विरोध झाल्याने लॉर्ड ऑकलंड याने ह्यात काही बदल केले. ~~त्या~~ त्याने याल काही 1839 ~~साल~~ साली बदल सुचविले ते पुढीलप्रमाणे.

1) पौर्वात्य शिक्षणावरही काही खर्च करावा.
2) एशियाटीक सोसायटीला दरमहा 500 रुपये अनुदान द्यावे.

या मुळे शिक्षणाबाबतचा वाद थंडावला.

Toppersnotes
Unleash the topper in you

वुडचा खलिता ⇒

भारतातील इंग्रजी शिक्षणाच्या मॅग्नाचार्टा असे या वुडच्या खलित्याला म्हटले जाते. हा काळ डलहौसीचा होता. त्यावेळी चार्ल्स ऑफ वुड हा बोर्ड ऑफ कंट्रोल चा अध्यक्ष होता.

शिफारशी

1) प्राथमिक शिक्षणाच्या प्रसारासाठी स्थानिक भारतियांनी काढलेल्या शाळांमधून प्रादेशिक भाषेतून शिक्षण द्यावे, प्राथमिक शिक्षणास उत्तेजन द्यावे.
2) अशा खाजगी शाळांना सरकारने अनुदान द्यावे.
3) माध्यमिक शाळांमध्ये मातृभाषेतून शिक्षण द्यावे.
4) उच्च शिक्षणाचे माध्यम इंग्रजी असावे.
5) शैक्षणिक अभ्यासक्रमात धार्मिक शिकवण दिली जाऊ नये. शिक्षण धर्मातीत असावे.
6) स्त्री शिक्षणास उत्तेजन द्यावे.
7) लंडन विद्यापीठाच्या धर्तीवर मुंबई, कोलकाता, चेन्नई या ठीकाणी विद्यापिठाची निर्मिती करावी.
8) प्रत्येक प्रांतात स्वतंत्र शिक्षण खाते निर्माण करावे. (शाळातपासणी करीता.)

Toppersnotes
Unleash the topper in you

9) शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी ट्रेनिंग स्कुल काढाव्यात.

10) खाजगी शाळा, कॉलेजेस काढण्याचा प्रयत्न करणाऱ्या प्रवृत्तीला अनुदान दयावे.

11) इंग्रजी भाषेच्या शिक्षणाची मागणी पूर्ण करावी.

12) कनिष्ठ पातळीपासून उच्च पातळीपर्यंत शिक्षणात सुसंवाद असावा.

13) शिष्यवृत्ती योजना सुरु करावी.

वुडच्या या शिफारशींचा प्रभाव 50 वर्ष राहीला.

* हंटर कमिशन

वुडच्या खलित्याची अंमलबजावणी किती प्रमाणात झाली याची पाहणी करण्यासाठी लॉर्ड रिपन यांच्या काळात सर विल्यम हंटर यांच्या अध्यक्षतेखाली हंटर कमिशन नियुक्त करण्यात आले. त्याच हंटर कमिशनने केलेल्या सुचना पुढीलप्रमाणे ⇒

1) उच्च शिक्षणात सरकारने जो पुढाकार घेतला तो कमी करुन शाळा-कॉलेज चालविण्याची जबाबदारी भारतियांवरच सोपवावी.

2) खाजगी शिक्षण संस्थांना अनुदान द्यावे.
3) कॉलेजसाठी सर्वसाधारण अनुदान व खास अनुदानाची पद्धत चालु करावी.
4) प्राथमिक शिक्षणास प्रोत्साहन द्यावे.
5) सरकारी शाळा खाजगी संस्थाकडे सुपुर्द कराव्यात.
6) सर्व प्राथमिक शाळांची तपासणी देखरेख सरकारी शिक्षण अधिकाऱ्यांनी करावी.
7) मुस्लीम समाजातील शिक्षणास सरकारने उत्तेजन द्यावे.
8) शिष्यवृत्ती बाबत विविध योजना निश्चित करावी. नविन नियम करावे.
9) फी आकारणी बाबत सर्वसाधारण सुत्र ठरवावे.
10) विद्यार्थ्यांच्या शारीरीक तसेच नैतिक शिक्षणावर भर द्यावा.
11) प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी शहरातून नगरपालीकांवर व जिल्हा बोर्डावर सोपवावी.
12) शासकीय व अशासकीय महाविद्यालयांतून नीतिधर्माची मुलभूत तत्वे शिकवणारी क्रमिक पुस्तके तयार केली जावीत.
13) विद्यापीठांनी पर्यायी ऐच्छिक अभ्यासक्रम सुरु करावेत.
14) कॉलेजमध्ये प्रत्येक सत्रात प्राचार्य कींवा प्रोफेसरने विद्यार्थ्यांच्या पुढे 'व्यक्तीची कर्तव्ये' या विषयावर व्याख्यान द्यावे.

अशा एकूण 23 सुचना हंटर कमिशनने केल्या होत्या.

20 व्या शतकाच्या पुर्वार्धातील महाराष्ट्राची शैक्षणिक प्रगती ⇒

महाराष्ट्रात अशा अनेक व्यक्ती होऊन गेल्या ज्यांनी शैक्षणिक संस्था स्थापन करून शैक्षणिक कार्यात योगदान दिले. महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी हिंगणे येथे महीला विद्यालय स्थापन केले. 1916 मध्ये S.N.D.T. हे विद्यापीठ स्थापन केले. पुण्याला टीळक महाराष्ट्र विद्यापीठ स्थापन झाले. महाराष्ट्रात अनेक ठीकाणी शाळा निघाल्या. इ.स. 1920 मध्ये गुजरात मधील अहमदाबाद येथे राष्ट्रीय विद्यापीठ निघाले ज्याचे कुलपती खुद्द गांधीजी होते. महाराष्ट्रातील विदर्भ, मराठवाडा या विभागातही शाळा निघाल्या.

महाराष्ट्रातील काही प्रमुख शिक्षण संस्था व त्यांच्या स्थापनेची वर्षे ⇒

| संस्था | वर्ष |
| --- | --- |
| 1) कृषी महाविद्यालय पुणे → | 1907 |
| 2) रयत शिक्षण संस्था → | 1919 |
| 3) श्री. शिवाजी शिक्षण संस्था अमरावती → | 1932 |

Toppersnotes
Unleash the topper in you

| संस्था | स्थापना वर्ष |
|---|---|
| 5) पीपल्स एज्युकेशन सोसायटी → | 1945 |
| 6) पीपल्स कॉलेज, नांदेड → | 1950 |
| 7) योगेश्वरी ~~व~~ महाविद्यालय आंबेजोगाई → | 1956 |
| 8) मिलींद महाविद्यालय औरंगाबाद → | 1950 |

* वृत्तपत्रे ⇒ इ.स. 1439 मध्ये गटेनबर्ग याने मुद्रणकलेचा शोध लावला. भारतात (1557) मुद्रणाची सुरुवात गोव्यात झाली. ब्रिटीश राजवटील मुद्रणकला व वृत्तपत्रे यांचा प्रारंभ झाला. मुंबई प्रांतात तर अत्यंत प्रतिकुल परीस्थीतीत वृत्तपत्रांनी वाटचाल केली. भारतात मुद्रणकलेचेचा प्रसार करण्याचे श्रेय डॉ केरे या मशीनरीला द्यावे लागेल. भारतीय भाषेतून प्रकाशित होणारे पहीले वृत्तपत्र 'समाचार दर्पण' हे होय.
स्वातंत्र्योत्तर मुंबईतून प्रथम ~~क्रमा~~ प्रकाशित होणारे नविन मराठी दैनिक लोकसत्ता होय.

19 व्या शतकातील प्रमुख मराठी पत्रे व संपादक ⇒

| पत्रान्चे नाव | पत्रान्चे संपादक |
|---|---|
| 1) दर्पण, दिग्दर्शन (1832, 1840) | - बाळशास्त्री जांभेकर |
| 2) प्रभाकर, धुमकेतू (1841 - 1853) | - भाई महाजन |
| 3) ज्ञानोदय, ज्ञानसिंधू (1842) | - विरेश्वर छत्रे |
| 4) ज्ञानप्रकाश, पुणे | - कृष्णाजी रानडे |
| 5) इंदुप्रकाश | - विष्णुशास्त्री पंडीत |
| 6) दीनबंधु (इ.स. 1877) | - कृष्णराव भालेराव |
| 7) सुधारक | - गो. ग. आगरकर |
| 8) शतपत्रे | - लोकहीतवादी |
| 9) निबंधमाला | - विष्णुशास्त्री चिपळूनकर |
| 10) द पुना ऑब्सर्व्हर (1852) | - बेहरामजी मलबारी |
| 11) रास्त गोफ्तार (मुंबई) (1851) | - दादाभाई नौरोजी |
| 12) दीनमित्र | - मुकुंदराव पाटील |

Times of India हे पत्र Bombay Times, Standard व टेलिग्राफ या 3 पत्रांचे एकत्रिकरण करून तयार करण्यात आले होते. परंतू जनतेला इंग्रजी भाषा उमगत नसल्याने या पत्रांच्या जास्त प्रसार झाला नाही. 1828 साली लॉर्ड बेटिंग हा गवर्नर जनरल या पदावर आला. तो वृत्तपत्र स्वातंत्र्याचा पुरस्कर्ता होता. देशी वृत्तपत्रामुळे ब्रिटीश सत्तेला धोका होईल ही भीती त्याला नव्हती

उलट वृत्तपत्रांमुळे लोकांचे अज्ञान दूर होईल या मताचा तो होता.

चार्ल्स मेटकाफ हा सुद्धा वृत्तपत्र स्वातंत्र्याचा पुरस्कर्ता होता. त्याच्या काळात वृत्तपत्रांना स्वातंत्र्य बहाल करण्यात आले होते. 1836-56 या काळात त्याने वृत्तपत्रांना चांगलेच स्वातंत्र्य बहाल केले होते.

* रेल्वे, टपाल, तारयंत्रे यांची प्रगती ⇒

डलहौसीच्या काळात संस्थाने खालसा केली गेली. (1848-56) त्यामुळे भारतात ब्रिटीशांचा विस्तार फार मोठ्या प्रमाणावर झाला. त्यामुळेच त्याला ब्रिटीश साम्राज्याचा शिल्पकार म्हटले जाते. त्यानेच रेल्वे, पोस्ट व तारयंत्राचा प्रारंभ भारतात केला. याचे कारण भारताचा विकास करणे हे नव्हते तर संपुर्ण भारतावर प्रभुत्व मिळवणे हे सोपे व्हावे यासाठी या सर्व सुधारणा भारतात केल्या गेल्या होत्या. त्याच्या काळात पुढील रेल्वेमार्ग सुरु झाले.

| | |
|---|---|
| मुंबई - ठाणे 1853 | कलकत्ता - राणीगंज 1855 |
| मद्रास - अर्काट | ठाणे - कल्याण 1854 |

Toppersnotes
Unleash the topper in you

त्याचप्रमाणे अनेक भागात असेच रेल्वे मार्ग सुरु झाले. ब्रिटीशकाळात रेल्वे मार्ग सरकारी निधितून बांधले गेले. त्यामुळे ब्रिटीश लोकांना भारतात भांडवल गुंतवता आले.

पोस्टाच्या कार्यपद्धतीत व पत्रे पाठविण्याच्या पद्धतीत लॉर्ड डलहौसीने आमुलाग्र बदल केले होते. या आधी पत्र पाठविण्याची पद्धत होती परंतू ज्या व्यक्तीच्या पत्त्यावर पत्र जाई त्याला पैसे भरावे लागत असे. या पद्धतीत सुधारणा लॉर्ड डलहौसीने केली. इ.स. १८५४ मध्ये नविन कायदा पास केला. त्या कायद्यानुसार बंगाल, मद्रास, मुंबई या इलाख्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी एक महानिर्देशक नियुक्त केला.

लॉर्ड डलहौसीने पोस्ट खात्याच्या कारभारात आमुलाग्र क्रांती घडवून आणली. इ.स. 1905 मध्ये रेल्वे मंडळ स्थापन झाले. रेल्वेमार्गाची संख्या झपाट्याने वाढतच गेली. 1947 पर्यंत भारतातच [5400 मैल] लांबीचे रेल्वेमार्ग तयार केले गेले होते.

लॉर्ड डलहौसीच्या काळातच टेलिग्राफ चीही सोय केली गेली. डलहौसीने भारतात

४ वर्ष कारभार पाहीला त्यात त्याने ८००० मैल लांबीच्या संदेशवाहक तारा टाकल्या गेल्या. या सोयीसुद्धा ब्रिटीशांच्या सोयीसाठीच केल्या होत्या. या सोयींमुळे ब्रिटीशांना दूरदूरच्या प्रदेशाशी संपर्क साधणे शक्य झाले.

1876 मध्ये अलेक्झांडर ग्राहम बेल याने इ.स. 1876 मध्ये टेलिफोनचा शोध लावला. या टेलिफोनला भारतात येण्यासाठी केवळ ६ वर्षे लागली. या सुविधेची गरज त्या काळी इंग्रज कारभाऱ्यांनाच होती. मुंबई, कोलकाता, चेन्नई व कानपूर सारख्या महत्वाच्या शहरांमध्येही ही सेवा पुरविण्यात आली. आपला देश जेव्हा स्वतंत्र झाला तेव्हा एक लाखाच्या जवळपास टेलिफोन सेवा कार्यान्वीत होती.

* रेल्वे, पोस्ट व तारयंत्राचे परिणाम :→

1) या सर्व सेवांमुळे देशातील सर्व मोठी शहरे एकमेकांना जोडली गेली.

2) कच्चा माल पुरवणारी केंद्रे एकमेकास जोडली गेली.

3) दुष्काळाच्या काळात आवश्यक ती सर्व सामग्री दुरदुरच्या प्रांतात पाठवणे शक्य झाले.

4) सामाजिक गतिमानता वाढली.

Toppersnotes
Unleash the topper in you

5) अस्पृश्यता, जातिव्यवस्था इत्यादींची बंधने कमी झाली.

6) राजकीय नेत्यांना इतर प्रांतातील नेत्यांशी, कार्यकर्त्यांशी व एकूण जनतेशी संपर्क साधने रेल्वेमुळे शक्य झाले.

7) ब्रिटीशांना लष्करी साहीत्याची ने-आण करणे सोपे झाले.

8) संपुर्ण देश एक सुत्रात बांधण्यासाठी रेल्वे सेवा, टपाल सेवा, दुरध्वनी सेवा उपयोगी ठरली.

9) जातीभेद, स्त्री-पुरुष भेद, सोवळे-ओवळे, भीन्नपणा इ गोष्टी रेल्वेमुळे मागे पडल्या.

Toppersnotes
Unleash the topper in you

## ब्रिटीश सत्तेची भारतामध्ये स्थापना

व्यापाराच्या उद्देशाने भारतात पोर्तुगिज, डच, त्यानंतर इंग्रज भारतात आले. ब्रिटीशांनी भारतावर राज्य करण्याच्या उद्देशाने आक्रमण केले नव्हते. तर त्यांना सुरुवातीला भारतामध्ये व्यापारच करायचा होता. येथे राज्य करण्याची त्यांची मनिषा नंतर उत्पन्न झाली.

- 1502 मध्ये वास्को द गामा भारतात परत आला.
- 1508 मध्ये फ्रान्सीस्को डी अल्मेडा याला भारतातील गवर्नर नेमले गेले.
- 1609 मध्ये सुरत येथे पहीली ब्रिटीश वखार स्थापन झाली.
- आणि तेव्हापासून भारतात इंग्रजी साम्राज्य पसरायला लागले.

# ★ सामाजिक - धार्मिक रॉय व ब्राह्मो समाज ★

➤ राजा राममोहन रॉय (१७७२-१८३३)

भारतीय समाज प्रबोधनाचे जनक व आद्य समाजसुधारक. तसेच त्यांना भारताच्या रेनिसन्सचे अर्थातच प्रबोधन काळाचे पितामह मानले जाते.

- आत्मीय सभेची स्थापना केली १८१५
- १८०३ ला 'तुफहत - उल - मुवाहिदिन' हा पहिला महत्त्वाचा ग्रंथ लिहिला.

★ त्यांची तत्वे

१. ईश्वर एकच आहे तो निर्गुण - निराकार - त्याची उपासना करावी.

२. सर्व धर्मांबद्दल समान बंधुभाव बाळगावा.

३. ईश्वर सर्वव्यापी शाश्वत असून तोच सर्व विश्वाची मार्गदर्शक शक्ती आहे.

४. आध्यात्मिक सुखासाठी ईश्वराची प्रार्थना व चिंतन आवश्यक.

• ब्राह्मो समाजात देवतांना बळी देणे, नैवेद्य म्हणून वस्तू अर्पण करणे, या प्रकारांनाही विरोध होता.

• हिंदू धर्मातील जातिव्यवस्थेला विरोध होता. ब्राह्मो समाजाच्या प्रसारासाठी 'संवाद कौमुदी' वृत्तपत्र काढले.

• ब्राह्मो समाजाला विरोध करण्यासाठी कर्मठ हिंदूंनी राधाकांत देव यांच्या नेतृत्वाखाली एक धर्मसभा बोलावली.

• १८३३ मध्ये रॉय यांचे निधन ब्रिस्टल (ब्रिटन) येथे झाले. काही काळ १८३८ पर्यंत द्वारकानाथ टागोर यांनी ब्राह्मो समाजाची जबाबदारी सांभाळली.

• राजा राममोहन रॉय यांच्या मृत्यूनंतर रामचंद्र विद्यावागिश हे ब्राह्मो समाजाची आठवड्याची प्रार्थना घेत.